**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई -१**

---

## भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी सूचना

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत दिनांक २२.११.२०१५ रोजी पदभरतीच्या अनुषंगाने लेखी परीक्षा आयोजीत करण्यात आली होती. त्यानंतर विविध टप्प्यात सदर पदभरतीबाबत प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार **शिल्प निदेशक पदे वगळून** इतर पदांच्या प्रोव्हिजल गुणवत्ता यादया व निकाल प्रसिध्द करण्यांत आलेला आहे.

दि.२ जानेवारी २०१७ रोजी उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी निकाल जाहिर केलेल्या यादीतील गुणानुक्रमे (मेरिटनुसार) व पदांच्या संख्येनुसार त्या त्या प्रवर्गाचे सामाजिक व समांतर आरक्षण यांच्या प्रमाणात उमेदवारांच्या कागदपत्रांची त्यांनी केलेल्या ऑनलाईन अर्जातील माहितीनुसार पडताळणी करण्यासाठी बोलाविण्यांत आले होते. त्यामध्ये काही भूकंपग्रस्त उमेदवारांकडून भूकंपग्रस्त समांतर आरक्षणांतर्गत यादीमध्ये समावेश करावा म्हणून निवेदने प्राप्त झाली. त्याअनुषंगाने सदर भरतीसाठी **भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणा** अंतर्गत अर्ज केलेल्या व **निवड प्रक्रियेत सहाय्यक भांडारपाल/भांडार लिपिक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक /कनिष्ठ लिपिक-टंकलेखक या पदाकरिता पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांनी** मुळ कागदपत्र पडताळणी करण्यासाठी **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड(पूर्व), मिठागर रोड, मुंबई -८१येथे दि. २/३/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता सर्व संबंधित कागदपत्रांसह उपस्थित रहावे.**

उमेदवारांचे संबंधित पदासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, विविध खेळातील प्राविण्य प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र व इतर अधिकचे आवश्यक प्रमाणपत्र, ही सर्व मुळ प्रमाणपत्रे (ओरिजनल सर्टिफिकेट ) यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यांत येणार आहे. त्यासोबतच सदर प्रमाणपत्राच्या प्रत्येकी २ छायांकित प्रती (ॲटेस्टेट/ सेल्फ अटेस्टेट ) सोबत असणे आवश्यक आहे.

**पडताळणी करीता कोणत्याही कारणास्तव गैरहजर राहील्यास व त्यांची पडताळणी न झाल्यास त्यांना निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. यानंतर यासंदर्भात कुठलाही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. पडताळणी करुन घेण्याची त्यांची व्यक्तिशः जबाबदारी राहील याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोद घ्यावी.**

**सही/-**
**अध्यक्ष**
**गट क व ड पदभरती सनियंत्रण समिती,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व**
**कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय**